0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचा दि. ०३/१०/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबत प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६८/२०११/जा.८०६, दिनांक ११/१०/२०११.

३) हरिकृपा बोटीचे मालक श्रीमती विजया प्रकाश कोळी व प्रकाश मारुती कोळी यांचे दिनांक २०/१०/२०११ रोजीचे एकत्रित निवेदन.

४) किरण शिवराज कोळी यांचे दिनांक २०/१०/२०११ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६८/२०११/जा ८६८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०८/११/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

## प्रकरणाची पार्श्वभूमी :-

सागर प्रहेरी बल (प) मधील पेटी ऑफीसर श्री. विद्याधर थाणाराम हे दिनांक २२/०९/२०११ रोजी संध्याकाळी १९:३० वाजल्यापासून FIC-I या बोटीवर गस्तकामी ड्युटी करीत असतांना, सुमारे २०:१५ वाजता CDHQ ड्युटी ऑफीसर यांनी संदेश दिला की, एक संशयीत बोट मिडल ग्राउंड जवळून उरणच्या दिशेने जात आहे. सदरचा संदेश मिळताच श्री. विद्याधर थाणाराम यांनी त्यांच्या सोबत तेथील २ अधिकारी सदर ठिकाणी गेले. सुमारे २१:०० वाजता अधिकाऱ्यांना मिडल ग्राउंडजवळ एक संशयित बोट दिसली. सदरच्या बोटीचे नाव हरिकृपा असे होते व ती लहान आकाराची होती. सदरची बोट ही मच्छिमारी होती. सदर बोटीमध्ये दोन हजर असलेल्या इसमांनी त्यांचे नाव प्रकाश मारुती कोळी व दुसऱ्याने त्याचे नाव किरण शिवराज कोळी असे सांगितले. सदर बोटीवर एकूण १८ प्लस्टीकचे काळ्या रंगाचे कॅन दिसून आले. त्यामध्ये डिझेल भरलेले दिसून आले. अधिकाऱ्यांनी सदर डिझेलमध्ये हात बुडवून त्याचा वास घेतला असता, तो डिझेलसारखा आढळून आला. त्यापैकी १४ कॅन पूर्ण

भरलेले, १ कॅन अर्धवट भरलेला व ३ कॅन रिकामे आढळून आले. त्यामध्ये एकूण डिझेल तेल ५०० लिटर मिळून आले.

वरील डिझेल तेल कोठून आणले व कॅनमध्ये का भरलेले आहे. याबाबत त्यांना विचारले असता, वरील बोटीतील नमूद दोन्ही इसम काहीही सांगू शकले नाहीत व त्यांनी सदरचे डिझेल हे एका अनोळखी बोटीतून फिशिंगसाठी घेतल्याचे सांगितले. सदर बाबत नंतर पोलिसांना कळवून त्यांच्याकडे बोट गेट या ठिकाणी वरील बेकायदेशिररित्या बाळगलेले डिझेल व वर नमूद बोटीतील दोन इसम यांना पोलिसांकडे कायदेशिर कारवाई कामी ताब्यात देण्यात आले.

तद्नंतर यलोगेट पोलिस ठाणेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. ढोके, सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. चिपकर व त्यांचे समवेत असलेले त्यांचे पथक हे पंचासमवेत दिनांक २३/०९/२०११ रोजी ००:४५ वाजता बोट गेट, बॅलेट बंदर येथील धक्का क्र. ०१ येथे पोहचले. पंचासमक्ष भेट दिली असता, तेथे हरिकृपा नावाची फिशिंग बोट आढळून आली व सदर बोटीवरील दोन इसम नामे प्रकाश मारुती कोळी व किरण शिवराज कोळी हे बोटीत उपस्थित होते व सदर बोटीमध्ये डिझेल ठेवलेले काळे कॅन आढळून आले.

उपस्थित पोलिसांनी पंचासमवेत सदरच्या बोटीमध्ये प्रवेश करुन बेटीमधील कॅनची बुचे उघडून त्यातील द्रवामध्ये बोटे बूडूवन व वास घेऊन पाहिले असता, सदर बोटीवरील कॅनमध्ये डिझेल आढळून आले. सदरचे कॅन हे प्रत्येकी ३५ लिटर क्षमतेचे १८ कॅन आढळून आले. त्यामध्ये १४ कॅन हे संपूर्ण भरलेले, १ कॅन अर्धवट भरलेला व उर्वरित ३ कॅन रिकामे आढळले. त्यामध्ये एकूण ५०० लिटर डिझेल आढळून आले. सदरचा डिझेल साठा बोटीवरील इसमांना कोठून आणले, याबाबत विचारले असता, त्यांनी सदरचा साठा एका अनोखळी बोटीकडून घेतल्याचे सांगितले व त्यांचेकडे कोणतेही कागदपत्रे नसल्याचे सांगितले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितानी संगनमत त्याच्या ताब्यात मिळालेल्या हरीकृपा या बोटीमध्ये विनापरवाना डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत:जवळ विनापरवाना बाळगला व ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जिवीतास पोहचण्याऱ्या कोणत्याही धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करण्याची जाणीवपूर्वक हयगय केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ [२] भा. द. वि. चे कलम २८५, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ४०/२०११,

दि.२३/०९/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ३५ लिटर क्षमतेच्या १८ कॅन व त्यामधील ५०० लिटर डिझेल साठा | ५०० लिटर | २२,५००/- |
| २ | एक हरिकृपा नामे लाकडी मच्छिमार बोट | १ नग | १,००,०००/- |
| | | एकूण | १,२२,५००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २५/१०/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस यलोगेट पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा सहा. पोलिस निरिक्षक श्री. एम. बी. चिपकर उपस्थित राहिले व त्यांनी दिनांक ०३/१०/२०११ रोजी सादर केलेले पत्र त्यांचे अभिवेदन समजावे असे सांगितले.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस हरिकृपा बोटीचे मालक श्रीमती विजया प्रकाश कोळी व प्रकाश मारुती कोळी हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये त्यांचे एकत्रित लेखी निवेदन सादर केले. तसेच किरण शिवराज कोळी हे सदर सुनावणीस उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये त्यांचे लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित यलोगेट पोलिस ठाणेचे तपासी पोलिस अधिकारी तथा सहा. पोलिस निरिक्षक श्री. एम. बी. चिपकर यांनी दिनांक ०३/१०/२०११ रोजी सादर केलेला अहवालच

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE ... AI

त्यांचे लेखी अभिवेदन समजावे असे सांगितले. सदर अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यातील सर्व मुद्देमाल अथवा त्या मधील डिझेल साठा याची विल्हेवाटीचे योग्य ते आदेश लवकरात लवकर होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित हरिकृपा बोटीचे मालक श्रीमती विजया प्रकाश कोळी व प्रकाश मारुती कोळी यांनी युक्तिवाद केला की, त्यांची मासेमारी व्यवसायाकरीता छोटी लाकडी बोट असून त्या बोटीला समुद्रात मासेमारी करणेकरीता सातत्याने डिझेलची आवश्यकता भासत असते. मासेमारी करणारे लोक हे अशिक्षित असून त्यांनी मासेमारी बोटीकरीता एका अनोळखी बोटीवाल्याकडून ५०० लिटर डिझेल त्यांना मासे देवून माश्यांच्या बदल्यात त्यांनी त्यांच्याकडून डिझेल घेतले होते. हि त्याच्याकडून त्यांच्या अज्ञानामुळे चुक झाली आहे. यापुढे ते आयुष्यात कधीही अशी चुक करणार नाही. सदरहू लाकडी मासेमारी बोट हि जयहरी कृपा या नावाने असून त्या बोटीमध्ये डिझेल ठेवण्यासाठी कोणतेही साधन नसल्याने सदर डिझेल हे त्यांनी कॅनमध्ये भरुन ठेवले होते. यापुढे ते अशाप्रकारे साठा करणार नाही. जशी गरज भासेल त्याप्रमाणे डिझेल परवाना धारकाकडून डिझेल खरेदी करु असे सांगून तसे एकत्रित लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित किरण शिवराज कोळी यांनी युक्तिवाद केला की, त्यांची मासेमारी व्यवसायाकरीता छोटी लाकडी बोट असून त्या बोटीला समुद्रात मासेमारी करणेकरीता सातत्याने डिझेलची आवश्यकता भासत असते. मासेमारी करणारे लोक हे अशिक्षित असून त्यांनी मासेमारी बोटीकरीता एका अनोळखी बोटीवाल्याकडून ५०० लिटर डिझेल त्यांना मासे देवून माश्यांच्या बदल्यात त्यांनी त्यांच्याकडून डिझेल घेतले होते. हि त्याच्याकडून त्यांच्या अज्ञानामुळे चुक झाली आहे. यापुढे ते आयुष्यात कधीही अशी चुक करणार नाही. सदरहू लाकडी मासेमारी बोट हि जयहरी कृपा या नावाने असून त्या बोटीमध्ये डिझेल ठेवण्यासाठी कोणतेही साधन नसल्याने सदर डिझेल हे त्यांनी कॅनमध्ये भरुन ठेवले होते. यापुढे ते अशाप्रकारे साठा करणार नाही. जशी गरज भासेल त्याप्रमाणे डिझेल परवाना धारकाकडून डिझेल खरेदी करु असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

सागर प्रहेरी बल (प) मधील पेटी ऑफीसर श्री. विद्याधर थाणाराम हे दिनांक २२/०९/२०११ रोजी संध्याकाळी १९:३० वाजल्यापासून FIC-I या बोटीवर गस्तकामी ड्युटी करीत असतांना, सुमारे २०:१५ वाजता

CDHQ ड्युटी ऑफीसर यांनी संदेश दिला की, एक संशयीत बोट मिडल ग्राउंड जवळून उरणच्या दिशेने जात आहे. सदरचा संदेश मिळताच श्री. विद्याधर थाणाराम यांनी त्यांच्या सोबत तेथील २ अधिकारी सदर ठिकाणी गेले. सुमारे २१:०० वाजता अधिकाऱ्यांना मिडल ग्राउंडजवळ हरिकृपा नावाची लहान आकाराची मच्छिमार बोट दिसली. सदर बोटीमध्ये प्रकाश मारुती कोळी व किरण शिवराज कोळी हे दोन इसम उपस्थित होते. सदर बोटीमध्ये एकूण १८ प्लस्टीकचे काळ्या रंगाचे कॅन डिझेल भरलेले दिसून आले. त्यापैकी १४ कॅन पूर्ण भरलेले, १ कॅन अर्धवट भरलेला व ३ कॅन रिकामे आढळून आले. त्यामध्ये एकूण डिझेल तेल ५०० लिटर मिळून आले.

वरील डिझेल कोठून व कशासाठी आणले याबाबत त्यांना विचारले असता, वरील बोटीतील नमूद दोन्ही इसम काहीही सांगू शकले नाहीत व त्यांनी सदरचे डिझेल हे एका अनोळखी बोटीतून फिशिंगसाठी घेतल्याचे सांगितले. सदर बाबत नंतर पोलिसांना कळवून त्यांच्याकडे बोट गेट या ठिकाणी वरील बेकायदेशिररित्या बाळगलेले डिझेल व वर नमूद बोटीतील दोन इसम यांना पोलिसांकडे कायदेशिर कारवाई कामी ताब्यात देण्यात आले. सदर बाबत अधिकाऱ्यांनी दिनांक २३/०९/२०११ रोजी ००:४५ वाजता पंचासमवेत उपरोक्त नमूद ठिकाणी भेट देऊन घटनास्थळी पोलिसांनी पंचासमवेत सदरच्या बोटीमध्ये प्रवेश करुन बोटीमधील कॅनची बुचे उघडून त्यातील द्रवामध्ये बोटे बूडूवन व वास घेऊन पाहिले असता, सदर बोटीवरील कॅनमध्ये डिझेल आढळून आले. याबाबत अधिक विचारले असता, त्यांनी सदरचा साठा एका अनोखळी बोटीकडून घेतल्याचे सांगितले व त्यांचेकडे कोणतेही कागदपत्रे नसल्याचे सांगितले. अशाप्रकारे उपरोक्त बोट व बोटीवरील आढळून आलेले डिझेलचा अनधिकृत साठा जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

हरिकृपा बोटीचे मालक श्रीमती विजया प्रकाश कोळी, प्रकाश मारुती कोळी व किरण शिवराज कोळी यांनी सुनावणीच्या वेळी दिलेल्या निवेदनात, त्यांची मासेमारी व्यवसायाकरीता छोटी लाकडी बोट असून त्या बोटीला समुद्रात मासेमारी करणेकरीता सातत्याने डिझेलची आवश्यकता भासत असते. मासेमारी करणारे लोक हे अशिक्षित असून त्यांनी मासेमारी बोटीकरीता एका अनोळखी बोटीवाल्याकडून ५०० लिटर डिझेल त्यांना मासे देवून माश्यांच्या बदल्यात त्यांनी त्यांच्याकडून डिझेल घेतले होते. हि त्याच्याकडून त्यांच्या अज्ञानामुळे चुक झाली आहे. यापुढे ते आयुष्यात कधीही अशी चुक करणार नाही. सदरहू लाकडी मासेमारी बोट हि जयहरी कृपा या नावाने असून त्या बोटीमध्ये डिझेल ठेवण्यासाठी कोणतेही साधन नसल्याने सदर डिझेल हे त्यांनी कॅनमध्ये भरुन ठेवले होते. यापुढे ते अशाप्रकारे साठा करणार नाही. जशी गरज भासेल त्याप्रमाणे डिझेल परवाना धारकाकडून डिझेल खरेदी करु असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...BAI

यावरुन सदरचे जप्त केलेले डिझेल हे त्यांनी परवानाधारकाकडून न घेता गैरमार्गाने मिळविला असल्याचे व अनधिकृत साठवणूक केल्याचे सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येते. तसेच पोलीसांनी केलेल्या खुलाशात, सदर बोटीमध्ये डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला व ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जिवितास पोहचण्याऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करण्याची जाणीवपूर्वक हयगय केली, असल्याचे नमुद केले आहे. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून मा.न्यायालयात याबाबत सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, जप्त करण्यात आलेला डिझेलचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेली जय हरी कृपा बोट ही सौ. विजया प्रकाश कोळी हिच्या मालकीची असून, सदरची बोट रजिस्ट्रार ॲण्ड पोर्ट ऑफिसर, मोरा ग्रुप ऑफ पोर्ट, ठाणे यांचे कार्यालयाकडे नोंदणी क्र. एमएच/एफ/एमओआर/०३/००५९२, दि. ११/०२/१० अन्वये नोंदणीकृत असल्याचे सौ. विजया प्रकाश कोळी हिने सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनात, बोटीकरीता एका अनोखळी बोटीवाल्याकडून सदर डिझेलचा साठा माश्यांच्या बदल्यात घेतल्याचे सांगून त्यांच्याकडून अज्ञानामुळे चूक झाली. तरी यापुढे आयुष्यात अशी चुक करणार नसल्याचे सांगितले. तसेच पोलीसांनी सुनावणीच्यावेळी दिलेल्या अभिवेदनात, सदर जय हरिकृपा या बोटीमध्ये डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला असल्याचे नमुद केले आहे. यावरुन बोट मालकाने जाणीवपुर्वक गैरमार्गाने मिळविलेल्या डिझेलची साठवणूक करण्याकरीता उक्त जय हरिकृपा बोटीचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तथापि, सुनावणीच्या दरम्यान जय हरिकृपा बोटीचे मालक यांनी सदर बोटीच्या व्यवसायावरच त्यांच्या कुटूंबाचे उदरनिर्वाह अवलंबून असल्याचे सांगितले, ही बाब विचारात घेता, शासनाचे परिपत्रक क्र. जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ना.पु.२३, दि. ३० ऑगष्ट, २००५ मधील निर्देशानुसार सदरची जप्त करण्यात आलेली बोट ही तीच्या सद्याच्या बाजार दराप्रमाणे येणाऱ्या एकुण किंमतीपैकी ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर बोटीचे मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे

CONTROLLER OF RATIONING & C
HEAD O
MUM

गुन्हा नोंद क्र. ४०/२०११, दि.२३/०९/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन 907
निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) जप्त करण्यात आलेली जय हरिकृपा ही लाकडी मच्छिमार बोट तिच्या सद्याच्या बाजार दराप्रमाणे येणाऱ्या एकुण किंमतीपैकी ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर तिच्या मालकास परत करण्यात यावी.

२) सदरची बँक हमी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी बोट मालकाची राहील.

३) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू बोट विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

४) तथापी, या बोटीच्या मालकाने अशी बँक हमी सादर न केल्यास सदर बोटीची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची बोट लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण ५०० लिटर डिझेलचा साठा पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ...CE

प्रति,

१) हरिकृपा बोटीचे मालक
२) प्रकाश मारुती कोळी

0008

३) किरण शिवराज कोळी

४) डिझेल पुरवठा करण्याऱ्या बोटीचे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

**प्रत,**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.